Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

**अतिवृष्टीमूळे उद्‌भवलेल्या पुरस्थितीत केलेल्या मदतीबाबत.**

शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयांमध्ये माहे ऑगस्ट २०१९ च्या पहिल्या आठवडयामध्ये अतिवृष्टीमूळे मोठयाप्रमाणात पूरस्थिती उद्‌भवलेली होती. या कठीण परिस्थितीत विद्यापीठातील विविध घटकांनी पूरग्रस्थांची विविध स्वरुपात मदत केलली आहे. पूरग्रस्थांच्या मदतीकरीता विद्यापीठामध्ये मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु यांच्या सहभागासह विविध समित्या गठीत करण्यात आलेल्या होत्या. या समितीच्या माध्यमातून विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/सेवक, विद्यार्थी यांनी पूरग्रस्थांना मदत पोहचविण्याचे काम केले आहे.

परंतू विद्यापीठाशी निगडीत बऱ्याच घटकांनी वैयक्तिकरीत्या/विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून पुरग्रस्थांना मदत केलेली आहे. सबब पूरग्रस्तांच्या मदतीसाठी विद्यापीठातील गठीत समिती व्यतिरीक्त ज्या शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/सेवक यांनी पुरग्रस्थांची मदत केलेली आहे, अशा विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/सेवक यांनी आपली नावे व केलेल्या मदतीची थोडक्यात माहिती मंगळवार दि. १० डिसेंबर २०१९ पर्यंत आस्थापना विभागास कळवावी. त्याची उचित दखल प्रशासनाकडून घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र. आस्थापना/** 4738
**दि.** 5 DEC 2019

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स.
२) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.